असा. क्र. ५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

**शुक्रवार, जानेवारी ९, २००९/पौष १९, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.**—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | ४१-४४ |

दिनांक ७ जानेवारी २००९ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ९ जानेवारी २००९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



[**किंमत** : रुपये १८.००]

## प्रकरण एक

## **प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) (क) कलमे १ आणि ७ हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास अंमलात येतील ;

(ख) उर्वरित कलमे, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील.

## प्रकरण दोन

## **मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याची सुधारणा.**

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " ग्रामपंचायत अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १०-१क मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. १९५९ चा मुंबई ३.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम ३०-१क समाविष्ट करणे.

**३.** ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३० नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

सरपंचाच्या राखीव पदाकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

" **३०-१क.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सरपंचाच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". २००१ चा महा. २३.

## प्रकरण तीन

## **महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची सुधारणा.**

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १२क मधील दोन्ही परंतुके वगळण्यात येतील. १९६२ चा महा. ५.

**५.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ४२ मध्ये, पोट-कलम (६) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

" (६क) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या अध्यक्षाच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". (२००१ चा महा. २३.)

**६.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ६७ मध्ये, पोट-कलम (७) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

" (७क) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या सभापतीच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.". (२००१ चा महा. २३.)

**७.** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाच्या कलम ७५क नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ यामध्ये कलम ७५ख समाविष्ट करणे.

" **७५ख.** जेव्हा कोणत्याही कारणामुळे, कोणत्याही वेळी सभापती, उप सभापती व कलम ७७क खालील सरपंच समितीचा सभापती यांची पदे एकाचवेळी रिक्त झाली असतील अशा बाबतीत, या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नवीन सभापतीची किंवा उप सभापतीची निवडणूक होईपर्यंत, राज्य शासनाला, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अन्य अधिकाऱ्याला,— (सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची अधिकार पदे एकाचवेळी रिक्त झाली असताना त्यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याला प्राधिकृत करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.)

(क) पंचायत समिती व सरपंच समिती यांच्या तसेच सदस्य वगळता सभापती, उप सभापती आणि सरपंच समितीचा सभापती यांच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी ; किंवा

(ख) सभापती, उप सभापती व सरपंच समितीचा सभापती यांच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यासाठी,

प्राधिकृत करता येईल.".

## प्रकरण चार

## संकीर्ण.

शंका निरसन करणे.

**८.** शंका निरसन करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमाची कलमे २, ३, ४, ५, ६ आणि ८ अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी झालेल्या ग्रामपंचायतीच्या किंवा पंचायत समितीच्या किंवा जिल्हा परिषदेच्या राखीव जागांच्या निवडणुकीचे विनियमन हे, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ हे अधिनियम जसे अस्तित्वात होते त्याप्रमाणे त्यांच्या संबंधित तरतुदींद्वारे, करण्यात येईल.

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

असा. क्र. ५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ९, २००९/पौष १९, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2008 (Mah. V of 2009), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. V OF 2009.

*(First published after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 7th January 2009).*

An Act further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961.

Bom. III of 1959. Mah. V of 1962.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Village Panchayats Act, 1958 and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY.

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Village Panchayats and the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis (Amendment) Act, 2008.

(2) (*a*) Sections 1 and 7 shall come into force on the date of publication of this Act in the *Official Gazette* ;

(*b*) The remaining sections shall come into force on such date as the State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958.

Amendment of section 10-1A of Bom. III of 1959.

**2.** In section 10-1A of the Bombay Village Panchayats Act, 1958 (hereinafter referred to as "the Village Panchayats Act"), both the provisos shall be deleted. Bom. III of 1959.

Insertion of section 30-1A in Bom. III of 1959.

**3.** After section 30 of the Village Panchayats Act, the following section shall be inserted, namely :—

Person contesting election for reserved office of *Sarpanch* to submit Caste Certificate and Validity Certificate.

"**30-1A.** Every person desirous of contesting election to the office of the *Sarpanch* reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of citizens, shall be required to submit alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes *(Vimukta Jatis)*, Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000.". Mah. XXIII of 2001.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

Amendment of section 12A of Mah. V of 1962.

**4.** In section 12A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (hereinafter referred to as "the Zilla Parishads and Panchayat Samitis Act"), both the provisos shall be deleted. Mah. V of 1962.

Amendment of section 42 of Mah. V of 1962.

**5.** In section 42 of the Zilla Parishads and Panchayat Samitis Act, after sub-section (*6*), the following sub-section shall be inserted, namely :—

"(*6A*) Every person desirous of contesting election to the office of the President reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of citizens, shall be required to submit alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with

Mah. XXIII of 2001. the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis*), Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000.".

**6.** In section 67 of the Zilla Parishads and Panchayat Samitis Act, after sub-section (7), the following sub-section shall be inserted, namely :— Amendment of section 67 of Mah. V of 1962.

"(*7A*) Every person desirous of contesting election to the office of the Chairman reserved for the Scheduled Castes, Scheduled Tribes or, as the case may be, Backward Class of citizens, shall be required to submit alongwith the nomination paper, Caste Certificate issued by the Competent Authority and the Validity Certificate issued by the Scrutiny Committee in accordance with Mah. XXIII of 2001. the provisions of the Maharashtra Scheduled Castes, Scheduled Tribes, De-notified Tribes (*Vimukta Jatis)*, Nomadic Tribes, Other Backward Classes and Special Backward Category (Regulation of Issuance and Verification of) Caste Certificate Act, 2000.".

**7.** After section 75A of the Zilla Parishads and Panchayat Samitis Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 75B in Mah. V of 1962.

"**75B.** Where for any reason, at any time, the offices of the Chairman, Deputy Chairman and Chairman of the Committee of *Sarpanchas* under section 77A become vacant simultaneously, then notwithstanding anything contained in this Act or the rules made thereunder, pending the election of the new Chairman or the Deputy Chairman, the State Government may, by order published in the *Official Gazette*, authorise the Chief Executive Officer or such other officer as may be specified by it in that behalf,— Power of State Government to authorise officer to exercise powers and perform duties, when offices of all presiding officers are vacant simultaneously.

(*a*) to exercise all the powers and to perform all the duties of the *Panchayat Samiti* and the Committee of *Sarpanchas*, including those of the Chairman, Deputy Chairman and Chairman of the Committee of *Sarpanchas*, to the exclusion of the members ; or

(*b*) to exercise all the powers and perform all the duties of the Chairman, Deputy Chairman and Chairman of the Committee of *Sarpanchas.* ".

## CHAPTER IV

### MISCELLANEOUS.

**8.** For the removal of doubt, it is hereby declared that, the election to a reserved seat to the Village *Panchayats* or *Panchayat Samitis* or *Zilla Parishads*, before the date of coming into force of sections 2, 3, 4, 5, 6 and 8 of this Act, shall be regulated by the relevant provisions of the Bombay Village Panchayats Act, 1958 or the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961, as they existed immediately before such date of commencement. Removal of doubt. Bom. III of 1959. Mah. V of 1962.